संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २९.१०.२०२६ | अंक नं. १७८ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

Viraasat By HEMRAJ CATERERS
हेमराज
दिवाळी फराळ
सथ्था कॉलनी, कोठी रोड, अहिल्यानगर. (MH)
9921599216 | 9890298899

राजपाल खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780



# अहिल्यानगरसह २० जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाचा हिरवा कंदील

नगर - ओबीसी आरक्षणाच्या कायदेशीर पेचामुळे रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेऊ शकता, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. ५० टक्क्यांच्या घटनात्मक मर्यादेचे पालन करून ओबीसी आरक्षणासह निवडणुका घ्या. या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलता येणार नाहीत, अशी स्पष्ट भूमिका घेत न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे राज्यातील अहिल्यानगरसह २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील ३ सदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार पडली.

निवडणुका घेण्यासाठी आयोगाला पुरेसे मनुष्यबळ पुरवा असे राज्य सरकारला आम्ही आधीच सांगितले आहे. प्रलंबित निवडणुकांची अधिसूचना न काढण्याचे समर्थन होऊच शकत नाही. आयोग आणि राज्य सरकारने निवडणुका घेण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी कराव्या आणि तसे आम्हाला सांगावे. आम्ही टाकलेल्या अटी-शर्तींनुसारच निवडणुका घेतल्या जाव्यात. अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात, ज्या निवडणुका अजून बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

वकील इंदिरा जयसिंग यांनी न्यायालच्या निदर्शनास आणून देताना सांगितले की, न्यायालयाच्या आदेशानुसार, १२ जिल्हा परिषदांमध्ये निवडणुका पार पडल्या आहेत. आता २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका बाकी आहेत. तुम्ही अंतिम सुनावणीसाठी प्रकरण पुढे ढकलत आहात, परंतु ओबीसींसाठी किती टक्के आरक्षण असावे हा मुख्य प्रश्न अजूनही निकाली निघायचा आहे. मी केवळ इतकीच विनंती करत आहे की, राज्य निवडणूक आयोगामार्फत यापूर्वी राबवल्या गेलेल्या प्रक्रियेप्रमाणेच उर्वरित निवडणुकाही पूर्ण केल्या जाव्यात. न्यायालयाच्या सध्याच्या आदेशांनुसार या निवडणुका सुरु राहू शकतात आणि त्यानंतर तुम्ही सुनावणीसाठी कोणतीही तारीख निश्चित करू शकता. ५० टक्क्यांच्या आरक्षणाचा मुद्दा या प्रकरणाच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल. यानंतर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी लोकशाही प्रक्रिया का थांबवली जावी अशी विचारणा केली. सॉलिसिटर जनरल यांनी कोणाला तरी यावर आक्षेप असू शकतो, असे नमूद करताच सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, आम्ही आधीच असा आदेश दिला आहे की, अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात. ज्या निवडणुका अजून बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात. मात्र, त्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील.

### या जिल्हा परिषदांच्या निवडणुका आहेत प्रलंबित

कोकण - पालघर,ठाणे. उत्तर महाराष्ट्र- अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव. मराठवाडा- बीड, जालना, नांदेड, हिंगोली. विदर्भ- अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर.

### अहिल्यानगर जिल्ह्याचे ग्रामीण राजकारण ढवळणार

सन २०१७ मध्ये अहिल्यानगर जिल्हा परिषदेची निवडणूक झाली होती. त्यानंतर कोरानामुळे मुदत संपल्यानंतर २०२२ मध्ये प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. परंतु त्यानंतर ओबीसी आरक्षण यासह विविध कारणांनी ही निवडणूक पुढे ढकलत राहिल्याने इच्छुकांचा हिरमोड होत गेला. एक पंचवार्षिकपेक्षा अधिक काळ अहिल्यानगर जिल्हा परिषद व १४ पंचायत समित्यांची निवडणूक प्रलंबित राहिलेली आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने नगरच्या ग्रामीण भागातील राजकीय घडामोडींना वेग येणार आहे.

CHANDUKAKA JEWELS
डिजिटल गोल्ड ॲप फक्त ४ पायऱ्यांत
Download the app and buy gold in 4 steps
फक्त ₹500 पासून 24 कॅरेट (995) शुद्ध सोनं खरेदी करा.
1 Play Store उघडा, Chandukaka Jewels सर्च करून Install दाबा. ॲप उघडून मोबाईल नंबर टाका आणि Generate OTP दाबा.
2 SMS वरचा OTP टाका आणि Submit दाबा. नंतर 4 अंकी PIN तयार करून Proceed दाबा. PIN ग्राहकानेच टाकावा.
3 बॉक्सवर टिक करून Accept दाबा. नंतर नाव, जन्मतारीख, पिनकोड आणि पत्ता भरा. Required* असलेली माहिती भरणं आवश्यक.
4 Quick Buy मध्ये Gold 24K-995 निवडा, ग्रॅम किंवा रक्कम टाका (किमान ₹500), तपशील बघून Pay Online दाबा.
किंवा हा QR स्कॅन करा
Scan to install directly
Android iPhone
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

शिवसेनेची बुलंद तोफ
कट्टर हिंदुत्ववादी ज्येष्ठ नेते



कै.अंबादास महादेव अस्वर (पंधाडे)
स्व : बुधवार दि.२१/१०/२०२६
दशक्रिया विधी : शुक्रवार दि.३०/१०/२०२६, सकाळी ८ वाजता
ठिकाण : नालेगाव अमरधाम, अहिल्यानगर
।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।
: शोकाकूल :
आमदार संग्राम अरुणकाका जगताप
राष्ट्रवादी काँग्रेस अहिल्यानगर जिल्हा

।। दशक्रिया विधी ।।



कै.अंबादास महादेव अस्वर (पंधाडे)
स्व : बुधवार दि.२१/१०/२०२६
मायेची गेली सावली !
करुणेचा हरवला सागर !!
उरली नाही साथ आम्हाला !
आठवण येते क्षणाक्षणाला !!
दशक्रिया विधी : शुक्रवार दि.३०/१०/२०२६, सकाळी ८ वाजता
ठिकाण : नालेगाव अमरधाम, अहिल्यानगर
।। दुखांकित ।।
समस्त अस्वर (पंधाडे) परिवार
अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जुन्या वादातून युवकास लाकडी दांडक्याने मारहाण, दोघांवर गुन्हा दाखल

नगर – बोल्हेगाव परिसरातील भारत बेकरीच्या पाठीमागे बालाजी नगर भागात घरासमोर घडलेल्या पूर्वीच्या वादातून एका युवकास लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात २ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सिद्धार्थ दत्तात्रय चौधरी (वय २४, रा. बालाजी नगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी सिद्धार्थ चौधरी हे त्यांच्या कामासाठी जात असताना आरोपी गणेश बाळू शिंदे आणि रोहित बाळू शिंदे (दोघे रा. गांधीनगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर) यांनी संगनमत करून त्यांना अडवले. आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत दमदाटी केली, तसेच आरोपी गणेश शिंदे याने हातातील लाकडी दांड्याने फिर्यादीच्या हातावर, पाठीवर व पायावर मारहाण करून गंभीर दुखापत केली.

तसेच दुसऱ्या आरोपीने लाथाबुक्क्यांनी मारहाण करत, जर तू परत आमच्या घराकडे दिसलास तर तुझे हातपाय तोडून जीवे मारून टाकू, अशी थेट धमकी दिली आहे. या हल्लयात जखमी झालेल्या फिर्यादीला उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटल अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या तक्रारीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# व्हिएतनाममधील विनफास्ट इलेक्ट्रिक उद्योग कंपनीने व्यवसाय विस्तारासाठी अहिल्यानगरचा विचार करावा

## आमदार संग्राम जगताप यांचे निमंत्रण; वाहन उद्योगासाठी अहिल्यानगर अनुकूल


विनफास्ट कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालिका कॅम ट्यु व्हो जस्मिन व विनफास्ट कंपनीचे मार्केटिंग हेड अनुराग सक्सेना यांची आ.संग्राम जगताप यांनी भेट घेऊन उद्योग विस्तारासाठी नगर हे योग्य ठिकाण असल्याचे निवेदन दिले.

नगर – व्हिएतनाममधील विनफास्ट या इलेक्ट्रिक स्कूटर व वाहन उद्योग कंपनीने भारतातील व्यवसाय विस्तारासाठी अहिल्यानगरचा विचार करावा. अहिल्यानगरमध्ये कंपनीच्या उद्योग विस्तारासाठी पोषक वातावरण आहे, असे निवेदन आमदार संग्राम जगताप यांनी कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालिका कॅम ट्यु व्हो जस्मिन यांना देऊन अहिल्यानगरमध्ये औद्योगिक व व्यावसायिक गुंतवणुकीसाठी निमंत्रित दिले.

संचालिका कॅम ट्यु व्हो जस्मिन व विनफास्ट कंपनीचे मार्केटिंग हेड अनुराग सक्सेना हे नगरमध्ये आले असता आमदार जगताप यांनी त्यांचे स्वागत करून उद्योग विस्तारासाठी नगर हे योग्य ठिकाण असल्याचे निवेदन दिले. यावेळी नगरसेवक विकी जगताप, सुरेश बनसोडे व निखील वारे उपस्थित होते.

यावेळी आ.जगताप यांनी कॅम ट्यु व्हो जस्मिन यांच्याशी चर्चा करून नगरमधील संधीची माहिती दिली. शहराची आधुनिकते कडे होणारी वाटचाल, नव्या व्यावसायिक संधी आणि औद्योगिक विकासाची क्षमता यांमुळे इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील कंपन्यांसाठी येथे अनुकूल व पोषक वातावरण आहे. अहिल्यानगर शहरातील रस्ते व रेल्वे वाहतूक व्यवस्था सक्षम असून, शिर्डीसह जवळच्या शहरांतील विमानतळांमुळे दळणवळणाच्या उत्तम सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे विनफास्ट कंपनीने भारतातील आपली गुंतवणूक वाढवताना अहिल्यानगरचा प्राधान्याने विचार करावा, अशी अपेक्षा आ.जगताप यांनी व्यक्त करून स्थानिक पातळीवरील आवश्यक सर्व सुविधांसह सहकार्य करण्याची तयारीही व्यक्त केली.

इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला देशात वाढत्या संधी उपलब्ध होत असताना, या क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती आणि व्यवसायवृद्धीला चालना मिळू शकते. कंपनीने अहिल्यानगरमध्ये उद्योग सुरू करण्याचा निर्णय घेतल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्यासह शाश्वत विकासालाही हातभार लागेल, असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला आहे.


**स्वस्तिक चौकात अतिक्रमण हटाव मोहीम** शहर वाहतूक शाखा आणि महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने २९ ऑक्टोबर रोजी स्वस्तिक चौक परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत चौक आणि पुणे बसस्थानक परिसरातील टपऱ्या, ट्रॅव्हल्स कंपन्यांचे बोर्ड, स्टॅण्ड्स काढून टाकण्यात आले. या मोहिमेत शहर वाहतूक शाखेचे अधिकारी, कर्मचारी, महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# वसंत टेकडीजवळून मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – वसंत टेकडीजवळ असलेल्या कलाम चौक परिसरात हॉटेलबाहेर पार्क केलेली हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल (क्र. यु.पी. ६५ डी.सी. २७२८) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तारकेश्वर आदिनारायण बेवरा (वय ४१, मूळ रा. आंध्रप्रदेश, हल्ली रा. श्रीराम चौक, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २४ ऑक्टोबर रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास कंपनीच्या कामासाठी मिळालेली मोटारसायकल घेऊन कलाम चौकातील वसंत टेकडीजवळ गेले होते. त्यांनी आपली मोटारसायकल एका दुकानासमोर पार्क केली आणि ते हॉटेल चौधरी येथे मित्रांसोबत जेवणासाठी गेले. रात्री अकरा वाजेच्या सुमारास जेवण करून बाहेर आले असता त्यांना लावलेल्या ठिकाणी मोटारसायकल दिसून आली नाही. त्यांनी परिसरात सर्वत्र शोध घेतला, परंतु गाडीचा काहीही पत्ता लागला नाही. अखेर त्यांनी पोलिसांत तक्रार नोंदवली. या प्रकरणी त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एमडी ड्रग्ज प्रकरणातील २३ आरोपींचे जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळले; गुन्ह्यात आणखी ३३ आरोपी निष्पन्न

## पोलिसांकडून या फरार आरोपींचा शोध सुरु

नगर – अहिल्यानगर शहराला नशामुक्त करण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत जप्त करण्यात आलेल्या तब्बल ३६ लाख ३९ हजार ८७४ रुपयांच्या एमडी (मॅफेड्रॉन) ड्रग्ज प्रकरणात न्यायालयाने सर्व २३ आरोपींचे जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावले आहेत.

अहिल्यानगर जिल्हा नशामुक्त करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्यांविरोधात मोहीम राबवली जात आहे. यादरम्यान, २० जुलै रोजी तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत लाखो रुपयांचे एमडी ड्रग्ज विकण्याच्या तयारीत असलेल्या तसेच रबरी मुखवटे, चाकू, प्लास्टिक पिस्तूल, हँडग्लोव्हज आणि दोरी यांसारख्या शस्त्रांसह अपहरण व दरोड्याच्या तयारीत असलेल्या आरोपींना अटक करण्यात आली होती. या प्रकरणी तोफखाना पोलिसांत भारतीय न्याय संहिता, एनडीपीएस कायदा आणि आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षकांनी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कौशल्याने तपास करत या रॅकेटची फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लिंक शोधून काढली. तपासादरम्यान गुन्ह्यात तब्बल ५७ आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी २३ आरोपींना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे.

अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज सादर केले होते. मात्र, तपासी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांनी न्यायालयात स्वतः हजर राहून आरोपींविरुद्ध सबळ पुरावे आणि भक्कम कायदेशीर बाजू मांडली. त्यामुळे न्यायालयाने सर्व २३ आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले आहेत. दरम्यान, या प्रकरणात अजूनही ३३ आरोपी फरार असून, त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

न्यायालयाने जामीन फेटाळलेल्या आरोपींमध्ये जिशान शौकत सय्यद (वय २६, रा. मुकुंदनगर, साहारा कॉलनी, अहिल्यानगर), रिहान जावेद शेख (वय २६, रा. छोटी मरीयम मस्जिद जवळ, मुकुंदनगर), वसिम खलिल बागवान (वय ३८,रा.पिंजार गल्ली, अहिल्यानगर), जमीर निसार शेख (वय ३७, रा. छोटी मरीयम मश्जिद जवळ, मुकुंदनगर), दानीश फारुक शेख (वय २९, रा. घर नं. २४/८० जुनी घासगल्ली, तांबटकर गल्ली, अहिल्यानगर), अलीरजा शकील शेख (वय १९, रा. पोलीस चौकी जवळ, गोविंदपूरा, मुकुंदनगर), मोहंमद उर्फ कासिफ सज्जाद खान (वय २६, रा. मोठया मस्जिद जवळ, वसीम ज्वेलर्स जवळ, मुकुंदनगर), परवेज उर्फ अप्पु खड्डा असदअली सय्यद (वय ३१, रा. शहा कॉलनी, गोंविंदपुरा), शाहिद शकील शेख (वय २३, रा.हडपसर, सय्यदनगर, महंमदवाडी रोड, पुणे), साद इक्बाल इनामदार (शेख) (वय २६, रा.पुणे वानवडी केदारी पेट्रोल पंपाजवळ, परमार गार्डन सोसायटी, पुणे), दिनेश तुषार यादव (वय २३,रा. इस्कॉन मंदीर जवळ, कादंबरी नगरी, फेज ४, सावेडी, अहिल्यानगर), कामरान कलीम शेख (वय २६, रा. घर नं. ५१०, शुक्रवार बाजार, लकी चिकनशॉप जवळ, भिंगार), अशरफ (अश्रफ) ऊर्फ हाजी नदीम शेख (वय २३, रा. दिपाली टॉकीज समोर, झेंडीगेट, अहिल्यानगर), अरशान रशीद सय्यद उर्फ मामा (वय २९, रा.फकिरवाडा, अहिल्यानगर), शाहरुख उर्फ पार्टी असलम शेख (वय – ३१, रा. आयेशा मस्जिदजवळ, गोविंदपुरा,अहिल्यानगर), अझहर वाहीदअली सय्यद (वय – ३५, रा. चाँद टेलर जवळ, वेल्जी हाईटस, झेंडीगेट, अहिल्यानगर), अनिकेत राहुल गायकवाड (वय २७, रा.तरवडे वस्ती, महंमदवाडी रोड, हडपसर, ता.हवेली जि.पुणे), झुल्करनेन अमनउल्ला शाहीद सय्यद (वय २१, रा. ख्रिस्तगल्ली, कैलास उडपी समोर, अहिल्यानगर), विजय उर्फ घाज्या अनिल बोर्डे (वय २६, रा.वसीम ज्वेलर्स घर नं.३४/४ मुकुंदनगर, अहिल्यानगर), साजिद ताहेर शेख ऊर्फ मुंबई (वय २८, रा.कोठला मस्तानशहा चौक, ह.रा.आलमगीर, अहिल्यानगर), आफताब ऊर्फ तौफिक राजु पठाण (वय २५, रा.रामगड, ए – १ सर्व्हिस सेंटर बेलापुर, ता.श्रीरामपुर), अमिन शौकत शेख (वय २८, रा.आश्रमशाळे जवळ, टाकळीकाझी, ता.नगर), निलेश दिपक जाधव (वय – ३२, रा. लक्ष्मीनगर, शिर्डी, ता. राहाता) या २३ आरोपींचा समावेश आहे. तर या प्रकरणात अजून ३३ आरोपी निष्पन्न झालेले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

# कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या २५ गोवंशीय जनावरांची सुटका


कत्तलीच्या उद्देशाने डांबुन ठेवलेल्या २५ गोवंशीय जनावरांची सुटका केल्यानंतर पकडलेल्या आरोपींच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंदे आणि गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई सुरू ठेवली आहे. संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत छापा टाकून पोलिसांनी कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेली तब्बल ५ लाख ३० हजार रुपये किमतीची २५ गोवंशीय जनावरांची सुटका केली आहे.या प्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले असून तीन जण फरार झाले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदार गणेश लोंढे, गणेश धोत्रे, अभिजीत अरकल, रणजीत जाधव, अमृत आढाव, सतीष भवर, विशाल तनपुरे व योगेश कर्डीले यांच्या पथकास मार्गदर्शन करून अवैध धंद्यांची माहिती काढण्यासाठी रवाना केले होते. २८ ऑक्टोबर रोजी तपास पथक संगमनेर शहर पोलीस स्टेशन हद्दीत गस्तीवर असताना, लाला रफीक कुरेशी, जहीर अन्वर कुरेशी आणि शमसू कुरेशी यांनी जमजम कॉलनीतील पाण्याच्या टाकीजवळ, मोना प्लॉट येथे गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली.

प्राप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचासमक्ष संबंधित ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी तेथे गोवंशीय लहान–मोठ्या गायी, गोऱ्हे व कालवडी अशी २५ जनावरे निर्दयीपणे डांबून ठेवल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून नदीम रेहमान कुरेशी (वय ३९, रा. मदीनानगर, संगमनेर) आणि राजमोहम्मद आरिफ सय्यद (वय ४०, रा. मदीनानगर, संगमनेर) या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी ही जनावरे लाला रफीक कुरेशी, जहीर अन्वर कुरेशी आणि शमसू कुरेशी (सर्व रा. संगमनेर) यांच्या मालकीची असल्याचे सांगितले. हे तीनही आरोपी सध्या फरार आहेत.

या प्रकरणी ताब्यात घेतलेले आरोपी आणि फरार आरोपींविरोधात संगमनेर शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम आणि प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध करणाऱ्या कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेली जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आली असून, प्रकरणाचा पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करत आहेत.

# सुरभी हॉस्पिटलमध्ये कोट्यवधींचा आर्थिक गैरव्यवहार

## संचालक डॉ.राकेश गांधीसह इतरांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

नगर – शहरातील छत्रपती संभाजीनगर रोडवरील सुरभी हॉस्पिटल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत संचालक पदाचा गैरवापर करून बनावट कागदपत्रे तयार करत सुमारे २ कोटी ७४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी संचालक डॉ. राकेश कांतीलाल गांधी व इतर जणांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अमित रसिकलाल कोठारी (रा. माणिकनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली असून, संचालक मंडळाच्या ठरावानुसार घेतलेल्या फॉरेन्सिक ऑडिटमध्ये कंपनीत मोठे आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आले आहेत. कंपनीच्या सुरुवातीच्या कार्यकाळात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर, जयेश चावडा अँड कंपनीमार्फत फॉरेन्सिक ऑडिट करण्यात आले होते. या ऑडिटमध्ये आयपीडी विभागातील २३० रुग्णांच्या उपचारांची नोंद कंपनीच्या हिशोबात न दाखवता सुमारे २ कोटी ३० लाखांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

तसेच रुग्णांकडून स्वीकारलेली ४४ लाखांची रक्कम तत्कालीन संचालक डॉ. राकेश कांतीलाल गांधी यांनी स्वतःकडे ठेवून तिचा वैयक्तिक स्वार्थासाठी गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. याशिवाय, कोणतीही प्रत्यक्ष सेवा न देता 'समृद्धी हेल्थकेअर' या फर्मसोबत परस्पर सामंजस्य करारनामा करून कंपनीच्या भागधारकांची दिशाभूल करण्यात आली व आर्थिक लाभ लाटण्यात आला.

संचालक मंडळाच्या चौकशीची कुणकुण लागताच, आरोपींनी कंपनीचे महत्त्वाचे दस्तऐवज आणि रेकॉर्ड स्वतःच्या ताब्यात घेऊन फौजदारी कृत्याचे पुरावे नष्ट केल्याचा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी तोफखाना पोलिसांनी संचालक राकेश गांधी व इतरांच्या विरुद्ध भा.दं. वि. कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, २०१, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# अपार्टमेंटच्या पार्किंगमधून मोपेडची चोरी

नगर – भिंगार परिसरातील सौरभनगर येथील एका अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये हँडल लॉक करून उभी केलेली होंडा कंपनीची व्हिएटर मोपेड (क्र. एम.एच. १६ बी.आर. ०६०१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ७ या दरम्यान घडली आहे.

याबाबत निलेश राजेंद्र गांधी (वय ३७, रा. स्वानंद रेसिडेन्सी, सौरभनगर, भिंगार) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# सुहास दिक्षीत यांचे अल्प आजाराने निधन



नगर – श्रीराम कॉलनी, नागरदेवळे येथील रहिवासी सुहास श्रीधर दिक्षीत (काका) (वय ८०) यांचे २८ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगी, जावई असा परिवार आहे. चेतन वसगडेकर यांचे ते सासरे होत.

# हरीशभाई मकवाना यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील हरीशभाई शिवलालभाई मकवाना (वय ७६) यांचे पुणे येथे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. उल्हासभाई मकवाना यांचे ज्येष्ठ बंधू, हिरेन मकवाना यांचे वडील होत.

# कल्याण रोडवरील महापालिकेच्या ग्रीन वेस्टच्या डम्पिंग यार्डला आग


कल्याण रोडवरील महापालिकेच्या ग्रीन वेस्टच्या डम्पिंग यार्डला लागलेली आग व त्यामुळे सर्वत्र पसरलेले धुराचे लोट छायाचित्रात दिसत आहेत.

नगर – वारूळाचा मारती परिसरात कल्याण रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या महापालिकेच्या ग्रीन वेस्टच्या डम्पिंग यार्डला २८ ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास मोठी आग लागली. झाडांच्या फांद्या. वाळलेला पालापाचोळा यामुळे काही मिनिटातच आग सर्वत्र पसरली. अग्निशामक दलाच्या पथकाने माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्यास सुरुवात केली.

दुपारी चार वाजल्यापासून रात्री नऊ वाजेपर्यंत सुमारे १२ ते १३ गाड्यांनी पाण्याचा मारा केला. आग विझवण्यात पथकाला यश आले असले तरी धग कायम असल्याने रात्री उशिरापर्यंत आणि पुन्हा २९ ऑक्टोबर रोजी सकाळी पाण्याचा मारा सुरूच होता. या आगीमुळे दुपारपासून सर्वत्र धुराचे लोट पसरले होते. लगतच्या घरांमध्येही धुराचे लोट पसरल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. डम्पिंग यार्डपासून सुमारे दोनशे मीटरच्या परिसरात नागरी वस्तीमध्ये आगीचा धूर पसरल्याने नागरिकही हवालदिल झाले होते.

रात्री उशिरापर्यंत आणि २९ ऑक्टोबर रोजी सकाळी पुन्हा महापालिकेच्या अग्निशामक दलाने या ठिकाणी पाण्याचा मारा करत आग विझवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अग्निशामक विभाग प्रमुख शंकर मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली माळीवाडा येथील पथकाचे वाहन चालक शुभम गावडे, फायरमन कृष्णा सांगळे, अविनाश साठे, दीपक गर्जे, विठ्ठल चितळकर तर सावेडी येथील पथकाचे वाहन चालक वैभव पिसे, फायरमन अनिकेत शेलार, भूषण घाटविसावे, कृष्णा जावळे, अक्षय पालवे आदींचा समावेश होता.

वारुळाचा मारुती परिसरातून डम्पिंग यार्डकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला कचरा, पालापाचोळा पेटलेला दिसून आला. डम्पिंग यार्डजवळ जाणीवपूर्वक कचरा पेटवल्याचा संशय व्यक्त होत आहे. मागील महिन्यातही याच परिसरात भंगार साहित्य पेटले होते.

# हद्दपारी आदेशाचा भंग; भिंगारमध्ये एकास पकडले

नगर – नगर जिल्ह्यातून एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आलेला तरुण प्रशासनाची परवानगी न घेता पुन्हा भिंगार परिसरात फिरत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला पकडले आहे. याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो. ना. बाळासाहेब गुंजाळ आणि पोलीस हवालदार सुनील पवार हे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या आदेशानुसार भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीत फरार व तडीपार आरोपींचा शोध घेण्यासाठी गस्त घालत होते. यादरम्यान सुनील पवार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, प्रतीक अजित लालबोंद्रे (वय २५, रा. खळेवाडी, भिंगार) याला नगर जिल्ह्यातून तडीपार केले असतानाही तो हद्दपार आदेशाचा भंग करून खळेवाडी, भिंगार येथे आला असून सध्या तिथेच थांबला आहे, अशी माहिती मिळाली.

प्राप्त माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने खळेवाडी, भिंगार येथे जाऊन सापळा रचला आणि प्रतीक लालबोंद्रे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता, उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार त्याला २० ऑगस्ट २०२६ पासून एक वर्षासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. असे असतानाही त्याने कोणतीही पूर्वपरवानगी न घेता हद्दपार आदेशाचा भंग करून शहरात पुनरागमन केल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी पो. ना. बाळासाहेब गुंजाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### ऋतुमानानुसार दिनचर्या

हवामानातील या बदलांचा थेट परिणाम आपल्या शरीरावर आणि पचनशक्तीवर होत असतो. त्यामुळे प्रत्येक ऋतूनुसार आपला आहार आणि दिनचर्या बदलणे निरोगी आयुष्यासाठी अत्यंत आवश्यक मानले जाते. उन्हाळ्यात सूर्याची उष्णता जास्त असल्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण वेगाने कमी होते आणि पचनशक्ती मंदावते. या दिवसांत अंगाची लाही लाही होत असल्याने शरीर थंड ठेवणाऱ्या आहाराला प्राधान्य दिले पाहिजे. आहारात ताक, नारळपाणी, लिंबू सरबत, वाळ्याचे पाणी आणि रसाळ फळांचा समावेश करावा. पचायला हलके असलेले अन्न खावे आणि जास्त तेलकट, तिखट किंवा मसालेदार पदार्थ टाळावेत. या ऋतूत सकाळी लवकर उठून हलका व्यायाम करावा आणि दुपारी कडक उन्हात बाहेर पडणे टाळावे. सुती आणि सैल कपडे वापरून शरीराला हवेशीर ठेवावे. पावसाळ्याच्या दिवसांत हवेत ओलसरपणा वाढतो आणि वातावरणातील जंतूंचा प्रादुर्भाव वाढतो. या काळात आपली पचनक्रिया सर्वात कमजोर झालेली असते, त्यामुळे पोटाचे विकार होण्याची शक्यता जास्त असते. पावसाळ्यात नेहमी उकळून थंड केलेलेच पाणी प्यावे. रस्त्यावरील उघड्यावरील अन्न, शिळे पदार्थ आणि जास्त ओलसर ठिकाणी तयार केलेले पदार्थ खाणे पूर्णपणे टाळावे. जेवणात सुंठ, ओवा, जिरे, लसूण आणि हळद यांसारख्या पाचक द्रव्यांचा वापर करावा. या दिवसांत अंग कोरडे ठेवणे आणि वैयक्तिक स्वच्छतेची विशेष काळजी घेणे अत्यंत गरजेचे असते. हिवाळा हा आरोग्याची कमाई करण्याचा आणि शरीर मजबूत करण्याचा ऋतू मानला जातो. या ऋतूत शरीरातील जठराग्नी तीव्र असतो, म्हणजेच पचनशक्ती खूप उत्तम असते. त्यामुळे या दिवसांत पचायला जड आणि पौष्टिक अन्न सहज पचू शकते.

## पाककला

### व्हेज भुना मसाला

**साहित्य :** बटाटा २ मध्यम चौकोनी चिरलेला, फुलकोबी १/२ वाटी, गाजर १/२ वाटी चिरलेले, हिरवा वाटाणा १/२ वाटी, शिमला मिरची १ लहान चौकोनी चिरलेली, बारीक चिरलेला कांदा २ मोठे, बारीक चिरलेला टोमॅटो २ मध्यम, आले-लसूण पेस्ट १ चमचा, २ चमचे तेल, १ चमचा बटर, १ चमचा जिरे, १/२ चमचा हळद, १ चमचा धने पावडर, १/२ चमचा जिरे पावडर, १ चमचा गरम मसाला, १ चमचा काश्मिरी लाल मिरची पावडर, १/४ चमचा काळी मिरी पावडर, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** बटाटा, फुलकोबी, गाजर, वाटाणा हलके वाफवून घ्या. कढईत तेल आणि बटर गरम करून जिरे घाला. त्यात बारीक चिरलेला कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत परतून घ्या. त्यात आले-लसूण पेस्ट घालून १ मिनिट परता. बारीक चिरलेला टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात हळद, धने पावडर, जिरे पावडर, लाल मिरची पावडर, काळी मिरी पावडर, गरम मसाला आणि मीठ घालून मिश्रण एकजीव करा. तेल सुटेपर्यंत मसाला मध्यम आचेवर भूना करा. त्यात वाफवलेल्या भाज्या आणि शिमला मिरची घालून मसाल्यात ५-६ मिनिटे चांगले परतून घ्या. गरज वाटल्यास १/४ वाटी गरम पाणी घाला. झाकण ठेवून ५ मिनिटे मंद आचेवर शिजवा. वरून बारीक चिरलेली कोथिंबीर पसरवा.

## वास्तू

### पार्किंग सुविधा

* वाहनतळ (पार्किंग) नेहमी आग्रेय किंवा वायव्य दिशेला असावे.

* मुख्य कंपाउंडचे गेट उत्तर, पूर्व किंवा ईशान्यात उघडणारे असावे.

* मुख्य दारावर लक्ष्मी, गणपती किंवा शुभ चिन्हांची नक्षी असावी.

* वजनदार आणि मोठे सोफे पश्चिम किंवा दक्षिण भिंतीला लागून असावेत.

## सौंदर्य

* पायांना आराम देण्यासाठी काकडीचा रस लावा.

* कोपरांवर लिंबाची साल घासल्याने काळेपणा दूर होतो.

## सल्ला

शेंगदाणे भाजून गार झाल्यावरच कूटावेत आणि त्यात थोडे मीठ घालून हवाबंद डब्यात ठेवल्यास कूट महिनाभर ताजा राहतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६**

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, मृग ०९।०५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज कामाच्या ठिकाणी धावपळ राहील आणि महत्त्वाच्या कामांमध्ये यश मिळेल.

**वृषभ :** तुमचे रखडलेले प्रश्न मार्गी लागतील व कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**मिथुन :** बौद्धिक क्षेत्रात तुम्हाला विशेष यश मिळून मान-सन्मान वाढेल.

**कर्क :** कौटुंबिक जीवनात सुख-शांति नांदेल व जुन्या मित्रांची भेट होईल.

**सिंह :** मान-सन्मानात वाढ होईल आणि विरोधकांवर सहज मात करू शकाल.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांकडून पूर्ण सहकार्य लाभेल.

**तुळ :** कला व साहित्यात रुची वाढेल आणि वैवाहिक जीवन आनंद राहील.

**वृश्चिक :** कौटुंबिक निर्णय घेताना वरिष्ठांचा सल्ला मोलाचा ठरेल.

**धनु :** धार्मिक कार्यांमध्ये सहभाग वाढेल आणि प्रवासाचे योग जुळून येतील.

**मकर :** व्यवसाय विस्तारासाठी केलेली मेहनत फळाला येईल.

**कुंभ :** सामाजिक वर्तुळात मान-प्रतिष्ठा वाढेल आणि नवीन ओळखी फायदेशीर ठरतील.

**मीन :** मनासारख्या घटना घडल्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल.

## फिल्मीचक्कर क्र. १२६० सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) जितेंद्र, तनुजा, संजीवकुमार, अंजली यांचा एक गाजलेला चित्रपट ५) धर्मेंद्र, रेखा यांचा एक चित्रपट ६) राजा और ++ (चित्रपटाचे नाव) ८) +++ देव कुलकर्णी (एक मराठी अभिनेत्री) १०) ++बदन (चित्रपटाचे नाव) १२) ऐश्वर्या रॉय, अक्षय खन्ना यांचा एक चित्रपट १४) +++ बारात (चित्रपटाचे नाव) १६) ++ ++ बीत जायेगा माटी के मोल जग मे रह जायेंगे प्यारे (गाणे) १८) सुनील दत्त, नूतन यांचा एक गाजलेला एक चित्रपट १९) ++ है ईमान मेरा यार मेरी जिंदगी (गाणे)

**उभे शब्द :-** १) धर्मेंद्र, राखी यांचा एक चित्रपट २) ++ काटकर (अभिनेत्री) ३) भारत-चीन यांच्यातील युद्धावर आधारित एक चित्रपट ज्यात धर्मेंद्र, प्रिया राजवंश आहेत ४) छोटीसी ++ (चित्रपटाचे नाव) ७) ++ + ताजा खबर (चित्रपटाचे नाव) ९) ++ मंगेशकर (प्रसिद्ध गायिका) ११) ++ जमाना (चित्रपटाचे नाव) १३) ++ ++ टोकियो (चित्रपटाचे नाव) १५) +++ पे सीतारे लपेटे हुये (गाणे) १७) ++ दौर (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** विश्वास ही अशी गोष्ट आहे, जी ठरवून नाही तर आपल्या वागण्यातून निर्माण होते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बास्केटबॉल व कॉर्फबॉल या दोन खेळांमध्ये काय फरक आहे?

बास्केटबॉल आणि कॉर्फबॉल हे दोन्ही खेळ हाताने चेंडू फेकून उंचावर असलेल्या रिंगमध्ये टाकण्याच्या कल्पनेवर आधारित असले, तरी त्यांची रचना, इतिहास, नियम आणि खेळण्याची संस्कृती यामध्ये मूलभूत आणि मोठा फरक आढळतो.

बास्केटबॉलची सुरुवात एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी अमेरिकेत झाली, तर कॉर्फबॉलची सुरुवात विसाव्या शतकाच्या सुरुवातीला नेदरलँड्समध्ये झाली. बास्केटबॉल हा मुख्यतः अतिशय वेगवान, आक्रमक आणि वैयक्तिक कौशल्याला प्राधान्य देणारा खेळ मानला जातो. या खेळात प्रत्येक संघात पाच खेळाडू मैदानात असतात. खेळाडू चेंडू जमिनीवर टपवून म्हणजेच ड्रिबल करत मैदानावर कुठेही फिरू शकतात. प्रतिस्पर्धी खेळाडूला चकवून थेट जाळ्यापर्यंत जाणे, हवेत उडी मारून चेंडू जाळ्यात टाकणे आणि आक्रमक बचाव करणे ही या खेळाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. बास्केटबॉलमध्ये पुरुष आणि महिलांचे स्वतंत्र संघ असतात. तसेच यामध्ये खेळाडूंमध्ये काही प्रमाणात शारीरिक संपर्क किंवा धक्काबुक्की होणे सामान्य मानले जाते. या खेळात जाळे ज्या रिंगला जोडलेले असते, तिच्या मागे एक मोठी लाकडी किंवा काचेची पाटी असते. त्यामुळे चेंडू पाटीला आदळून रिंगमध्ये जाण्याची संधी खेळाडूंना मिळते.

याउलट, कॉर्फबॉल हा खेळ जगातील अतिशय वैशिष्ट्यपूर्ण खेळांपैकी एक आहे, कारण हा खेळ स्त्री आणि पुरुष यांच्यातील पूर्ण समानतेवर आधारित आहे. कॉर्फबॉलच्या एका संघात आठ खेळाडू असतात, ज्यामध्ये चार महिला आणि चार पुरुष खेळाडूंचा समावेश असतो. या खेळाचा सर्वात मोठा नियम म्हणजे यात चेंडू घेऊन धावणे किंवा चेंडू जमिनीवर टपवणे पूर्णपणे बंदी असते. खेळाडू चेंडू हातात आल्यावर फक्त एका जागी स्थिर राहून आपल्या सहकाऱ्याला पास देऊ शकतो. यामुळे वैयक्तिक चमक दाखवण्यापेक्षा संपूर्ण संघाच्या समन्वयावरच विजय अवलंबून असतो. कॉर्फबॉलमध्ये कोणत्याही प्रकारचा शारीरिक संपर्क किंवा धक्काबुक्की करण्यास सक्त मनाई असते. खेळाडूंना दुखापत होऊ नये आणि खेळ अत्यंत शिस्तबद्ध राहावा यासाठी हा नियम तयार करण्यात आला आहे. यात बचावाचा नियमही अतिशय कडक असतो; पुरुष खेळाडू केवळ पुरुष खेळाडूचा आणि महिला खेळाडू केवळ महिला खेळाडूचाच बचाव करू शकते. जर प्रतिस्पर्धी खेळाडूने योग्य अंतर ठेवून हात वर करून बचाव केला, तर त्या स्थितीत थेट जाळ्यात चेंडू फेकण्यास बंदी असते. कॉर्फबॉलमधील जाळे एका उंच खांबावर स्वतंत्रपणे बसवलेले असते आणि त्याच्या मागे कोणतीही पाटी नसते. यामुळे खेळाडूंना खांबाच्या चारी बाजूंनी फिरून कोणत्याही कोनातून गोल करण्याची पूर्ण मोकळीक मिळते.

एकंदरीत विचार केला तर बास्केटबॉल हा वैयक्तिक कौशल्य, वेग, ताकद आणि आक्रमक रणनीतीवर चालणारा जागतिक स्तरावरील लोकप्रिय खेळ आहे, तर कॉर्फबॉल हा परस्पर सहकार्य, अचूक पासिंग, शिस्त आणि स्त्री-पुरुष समानतेचे उत्तम उदाहरण मांडणारा एक अनोखा खेळ आहे.

## निसर्गाची शिकवण

एका सुंदर आणि हिरव्यागार बागेत एक देखणे, डौलदार गुलाबझाड होते. त्याला आपल्या सौंदर्याचा आणि लालभडक फुलांचा खूप अभिमान होता. त्या बागेच्या एका कोपऱ्यात जमिनीच्या आत खोलवर एक कष्टाळू मूळ होते, जे दिवस-रात्र मातीतून पाणी आणि अन्नद्रव्ये शोधून संपूर्ण झाडाला पोहोचवत असे.

एक दिवस बागेत काही पाहुणे आले. त्यांनी गुलाबाच्या फुलांचे भरभरून कौतुक केले. किती सुंदर आणि देखणा गुलाब आहे! असे म्हणून एका पाहुण्याने गुलाबाचा फोटो काढला. हे ऐकून गुलाबाला अजूनच गर्व चढला. त्याने जमिनीखालील मुळाला उद्देशून उपरोधाने म्हटले, अरे मुळा, तू दिवसभर त्या काळ्या, अंधाऱ्या मातीत खपतोस; पण तुझे कोणी कौतुक करते का? तुझे अस्तित्व कोणाला माहीतही नाही. सौंदर्य आणि सुगंध तर माझाच आहे, त्यामुळे या बागेची खरी शोभा माझ्यामुळेच आहे. जमिनीखालील मुळाने गुलाबाचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले, पण ते काहीच बोलले नाही. ते आपले मूक काम करत राहिले.

काही दिवसानंतर अचानक हवामानाने वळण घेतले. काळेकुट्ट ढग जमा झाले आणि बागेत मुसळधार पाऊस सुरू झाला. पाऊस थांबल्यावर सोसाट्याचा वादळी वारा वाहू लागला. वाऱ्याच्या एका जोरदार झटक्याने बागेतील अनेक झाडे उन्मळून पडू लागली. तो डौलदार गुलाबही भीतीने थरथरू लागला. वादळाचा वेग इतका जास्त होता की, आता तो हवेत उडून जाईल असे त्याला वाटले. त्या कठीण प्रसंगी जमिनीखालील त्या काळ्या मुळाने आपली ताकद पणाला लावली. त्याने मातीला घट्ट पकडून ठेवले आणि संपूर्ण झाडाला स्वतःशी बांधून ठेवले. कितीही मोठे झोत आले तरी मुळाने झाडाला जमिनीपासून विलग होऊ दिले नाही. अखेर वादळ शांत झाले.

बागेत पुन्हा शांतता पसरली. वादळात आजूबाजूची बरीच झाडे कोलमडली होती, पण डौलदार गुलाब मात्र ताठ उभा होता. जेव्हा त्याने स्वतःकडे पाहिले, तेव्हा त्याला आपली चूक समजली. त्याला उमगले की वर दिसेल तेवढेच जग नसते; जे वरून साधे किंवा कुरूप दिसते, तेच आतून संपूर्ण संरक्षणाचा पाया असतो.

गुलाबाने आपली मान खाली घातली आणि जमिनीखाली साद घातली, मित्रा, मला माफ कर! मी माझ्या वरच्या सौंदर्याच्या गर्वात तुझ्या खऱ्या आणि अदृश्य कष्टांचा अपमान केला होता. आज जर तू मला मातीत घट्ट धरून ठेवले नसते, तर माझे अस्तित्वच उरले नसते. हे ऐकून जमिनीखालून मुळाने मायेचा ओलावा पाठवला आणि प्रेमाने उत्तर दिले, मित्रा, आपण दोघे वेगळे नसून एकाच झाडाचे दोन भाग आहोत. तुझे सौंदर्य हे माझ्या कष्टांचे फलित आहे, आणि माझे अस्तित्व तुझ्या यशात आहे.

बोध : माणसाने आपल्या रूपाची, संपत्तीची किंवा हुद्याची कधीही गर्व बाळगू नये. दिसणाऱ्या सौंदर्यापेक्षा अदृश्य पाया, प्रामाणिक मेहनत आणि संस्कार (मुळे) हेच माणसाला संकटाच्या काळात टिकवून ठेवतात. आत्मसन्मान स्वतःच्या कर्तृत्वाने आणि नम्रतेने मिळतो, गर्वाने नाही.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

जो कोणी ह्या ज्योति-श्रुतींच्या संपर्कात येतो तो धर्मग्रंथात दिल्या गेलेल्या संदर्भाचा व आदेशांचा वास्तविक अर्थ समजू शकतो. बहुतेक धर्मग्रंथात अलंकारिक आणि सांकेतिक भाषांचा वापर केला गेला आहे. ह्या गूढ रहस्यांचा उलगडा तोंडी स्वरूपात केला जात असे. धर्मग्रंथ वाचून पुरेशा प्रमाणात समजले जाऊ नये हेच त्यामागचे कारण होते. फक्त काही लोकच गुरुंनी तोंडी समजावून दिलेले रहस्यमय असे ज्ञान जाणत होते व धर्मग्रंथात दिल्या गेल्या उल्लेखांचा खरा अर्थ समजू शकत. जर आम्ही ही भाषा समजून घेतली तर आम्हीही धर्मग्रंथात रचनात्मक शक्तीसंदर्भात दिल्या गेलेल्या उल्लेखांचा खरा अर्थ समजू शकू ! ज्योति आणि श्रुतीवर ध्यान टिकविणेह्या ध्यान प्रक्रियांतर्गत दोन प्रकारचे अभ्यास असतात.

एक म्हणजे अंतरीय ज्योतिवर ध्यान एकाग्र करणे व दुसरा म्हणजे अंतरीय ध्वनी अथवा अंतरीय नाद ऐकणे. ह्या दोन्ही प्रकारच्या अभ्यासाचा हेतू आम्ही अंतरीय ज्योति आणि श्रुतिशी जोडले जावे म्हणजे आत्मा देहबुद्धीच्या वर येऊन अंतरीय मंडळात प्रवेश करू शकेल.ज्योति पाहण्यासाठी आम्ही आमचे ध्यान शिवनेत्र म्हणजेच दिव्यनेत्रावर केंद्रित करावे. त्याबरोबर आम्ही परमेश्वराच्या नामांचा जप (गुरु मुखातून दीक्षेच्या वेळी जो नाममंत्र दिला जातो तो मनाने आधी १०-१५ मिनिटे) करावा म्हणजे आमचे मन शांत होईल व अंतर्मुखता साधल्याने आम्हाला ज्योतिचे दर्शन होईल. ह्या अभ्यासासाठी खाली दिलेल्या नियमांचे पालन करावे. प्रथम शरीर स्थिर करावे व जास्तीत जास्त वेळ बसता येईल अशा रितीने बसा. कोणासही खेटून बसू नये. स्वतंत्र वेगळे बसावे. त्यासाठी खास आसन व मुद्रांची आवश्यकता नाही. फक्त अशा स्थितीत बसावे की जास्तीत जास्त वेळेपर्यंत आपण आरामात बसू शकू.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

शिवानीदीदी : तो सल्ला आहे आणि ती वेगळी गोष्ट आहे. सल्ला आणि अभिप्राय मागणं ठीक आहे पण त्यानंतर निर्णय माझा मी घ्यायला हवा आणि कृती करायला हवी. तुम्ही सुरुवातीला दिलेलं उदाहरण घेऊ या. तुम्ही साधी गाडी वापरण्याची की चांदीची हे तुम्ही तुमच्या क्षमतेअनुसार ठरवायला हवं. इतर लोक तुमच्याबद्दल काय मत बनवतील या आधारावर कृती करायला नको. कधीकधी आपण आपल्या क्षमतेपेक्षा जास्त गोष्टी करतो. तुमच्या क्षमतेनुसार काम करा.

सुरेश ओबेरॉय : हो, कधीकधी लोक त्यांच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांवर छाप पाडायची म्हणून शेजाऱ्याकडून गोष्टी मागून आणतात.

शिवानीदीदी : आपण आपल्या क्षमतेपेक्षा जास्त करतो कारण आपण लोकांच्या कौतुकाचे भुकेले आहोत. अशा वेळी कौतुक होत असताना आणि त्या नंतरही आपल्याला शांत वाटत नाही. जेव्हा मन स्थिर नसतं तेव्हा प्रेमाच्या मुळ ऊर्जेमध्ये अडथळा येतो. म्हणूनच आपल्या समजेअनुसार, सहज भावाने आणि अंत:प्रेरणेने आपल्याला जे योग्य वाटतं त्याप्रमाणे आपण कृती करायला हवी.

सुरेश ओबेरॉय : हे जग अशी जागा आहे जिथे तुमची इच्छा असेल तरी तुम्ही स्वतःला बदलू शकत नाही. जेव्हा मी अहंकार सोडून द्यायचा म्हणून छोट्या छोट्या गोष्टी करत होतो, जसं मी जाणूनबुजून इकॉनॉमी क्लासने विमान प्रवास करायचो तेव्हा विमानातला स्टाफ, तुम्हाला जागा बदलून हवी आहे का, असं मला विचारायचा. शिवानीदीदी : ठीक आहे. आपल्या आजूबाजूच्या लोकांमध्ये, 'लोक काय म्हणतील' हा संस्कार आहे हे आपल्याला माहीत आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पहिला मित्र : भावा, तुझा चेहरा खूप ओळखीचा वाटतोय,
आपण आधी कुठे भेटलोय का?
दुसरा मित्र : हो, आपण दोघेही एकाच वर्गात सलग तीन वर्षे होतो!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील सर्वात मोठा आणि सर्वात खोल महासागर कोणता आहे?

– पॅसिफिक महासागर (प्रशांत महासागर)

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

४) जातकर्म संस्कार : प्रसुतीनंतर बाळाची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी व त्याची बौद्धिक वाढ करण्यासाठी मधातून सुवर्ण चाटविणे, औषधीसिद्ध जलाने स्नान घालणे, आईच्या स्तनामध्ये निर्माण होणारा चिकट स्राव (कोलोस्ट्रम) बाळाला पाजणे. हे बाळाच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. या सर्व कृतींना जात कर्म संस्कार म्हणतात.

५) नामकरण संस्कार : बाळाचा जन्म झाल्यानंतर पुढील आयुष्यात त्याची विशिष्ट नावाने ओळख होणे जरूरीचे असते. त्या नावावरून त्याला यशप्राप्ती, दीर्घायुष्य मिळण्यासाठी शुभदिवशी अर्थपूर्ण नाव ठेवले जाते. यालाच नामकरण संस्कार म्हणतात.

६) निष्क्रमण संस्कार : बाळाला जेव्हा पहिल्यांदा घराबाहेर नेले जाते त्या वेळेस जो संस्कार केला जातो, त्याला निष्क्रमण संस्कार असे म्हणतात. बाळाला ज्या दिवशी घराबाहेर घेऊन जायचे आहे त्या दिवशी बाळाला देवघरामधील कुंकवाचा टिळा लावावा. त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करावी. त्याला इतर लोकांची नजर लागू नये, याची देवाजवळ प्रार्थना करावी व प्रथमतः त्याला घराबाहेर नेल्यावर मंदिरामध्ये दर्शन घेण्यास जावे व देवाधिकांचा शुभाशीर्वाद घ्यावा.

७) अन्नप्राशन संस्कार : आईच्या दुधाशिवाय बाळाला जेव्हा बाहेरचे अन्न सुरू करतो. त्या वेळेस प्रथमतः अन्नाची पूजा करून 'अन्नप्राशन संस्कार' केला जातो. सहाव्या महिन्यामध्ये बाळाला वरण भाताचे पाणी, फळांचे रस, नाचणी सत्व सुरू करावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# सारडा महाविद्यालयाच्या ‘बिन रंगाची गोष्ट’ एकांकिकेला नाट्यपरिषद करंडक स्पर्धेत सांघिक तृतीयसह ५ परितोषिके

नगर – अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धेच्या अंतिम फेरीत पेमराज सारडा महाविद्यालयाच्या ‘बिन रंगाची गोष्ट’ या एकांकिकेला सांघिक तृतीय रुपये ५० हजार पारितोषिकासह अनेक बक्षिसे प्राप्त झाली आहेत. बिन रंगाच्या गोष्ट ही एकांकिका जिल्ह्यात अव्वल ठरल्यावर मुंबईत झालेल्या महाअंतिम फेरीतही सारडा महाविद्यालयाच्या संघाने भरघोस यश संपादन करत मुंबईतही आपला डंका पेटवला आहे, अशी माहिती हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई यांनी दिली.



नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धेत सांघिक तृतीय परितोषिक मिळवलेल्या सारडा महाविद्यालयाच्या ‘बिन रंगाची गोष्ट’ या एकांकीकेतील एक प्रसंग.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एका खुली नाट्यपरिषद करंडक एकांकिका स्पर्धा घेण्यात आली. यंदा या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातल्या आठ केंद्रांमधून जवळपास अडीचशे एकांकिकांनी यामध्ये सहभाग नोंदवला. या स्पर्धेच्या नगर केंद्रावर झालेल्या प्राथमिक फेरीत सारडा महाविद्यालयाच्या बिन रंगाची गोष्ट या एकांकिकेने प्रथम स्थान पटकावत अंतिम फेरीमध्ये जाण्याचा मान मिळवला.

अंतिम फेरीमध्येही मोठे यश संपादन करत या एकांकिकेला नेपथ्य तृतीय पारितोषिक – संकेत, यशवंत, विशाल, वैष्णवी मोटे. लक्षवेधी अभिनेता यशवंत दुसुंगे, लक्षवेधी अभिनेत्री मृण्मयी ठोंबे, दिग्दर्शन तृतीय निरंजन केसकर व सांघिक एकांकिका तृतीय परितोषिक रोख ५० हजार आणि सन्मानचिन्ह अशी पारितोषिके पटकावली आहेत. मिळाली. नाट्य परिषदेचे अध्यक्ष आणि अभिनेते प्रशांत दामले, स्पर्धेचे परीक्षक चंद्रकांत कुलकर्णी, अभिनेत्री शिल्पा तुळसकर आणि शरद पोंक्षे यांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण झाले.

बिन रंगाची गोष्ट या एकाकीकेची माहिती देताना कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी सांगितले, सध्या पाण्याचा प्रश्न हा गंभीर बनलेला असून याच विषयावर ही एकांकिकेने प्रकाश टाकला आहे. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी गौरी डांगे यांनी ही एकांकिका लिहिलेली असून, याचं दिग्दर्शन महाविद्यालयाचा विद्यार्थी निरंजन केसकर यांनी केलेला आहे. या नाटकाची मूळ संकल्पना ही अमोल साळवे यांची आहे. या विद्यार्थ्यांना नाट्य परिषद उपनगर शाखेचे अध्यक्ष आणि महाविद्यालयातील प्राध्यापक प्रसाद बेडेकर यांचे मार्गदर्शन मिळाले.

बिन रंगाची गोष्ट या एकांकिकेने नुकत्याच नाशिक येथे झालेल्या सकाळ वृत्त समूहाच्या स्पर्धेमध्येही सहा प्रथम पारितोषिके मिळवून त्याही स्पर्धेच्या अंतिम फेरी गाठली आहे, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी दिली.

यशाबद्दल सर्व कलाकारांचे व टीमचे हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, मानद सचिव सुमतीलाल कोठारी, जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा यांच्यासह संचालक व अ.भा.नाट्य परिषदेचे अध्यक्ष आणि कलाकार प्रशांत दामले, नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अहिंसा कशाला म्हणावे?




अहिंसा हे एक व्रत मानले आहे. जीवन सुखी होण्यासाठी हे आचरणे गरजेचे आहे. पण अहिंसा कशाला म्हणावे ? लिंगपुराण सांगते,

आपण आपल्या कल्याणासाठी नेहमीच प्रयत्नशील असतो ना. तसेच इतर सर्व प्राणिमात्रांच्या भल्यासाठी झटत राहणे, याचेच नाव अहिंसा.

आई बाळाला रागावते, मास्तर तर विद्यार्थ्यांना मारतातदेखील, पण हे सगळे बाळाच्या व विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीच. अहिंसाव्रत पाळण्यासाठीच. मास्तर विद्यार्थ्याला मारतात, हा दयाळनाथांचा भूतकाळातला श्लोक आहे. आमच्या काळीदेखील मास्तर आम्हाला वर्गात खूप मारीत असत.

धम्मपदात गौतमबुद्ध म्हणतात. माणसाच्या भल्यासाठी झटतात, ते मुनी म्हणवितात, तेच अहिंसापालन करणारे ठरतात. विचार आणि आचारांवर ते नियंत्रण ठेवतात. त्यांना मग खूप मोठे मानाचे स्थान लाभते. असले अंहिसाव्रत पालन करणाऱ्याला कधीही दुःख वा पश्चाताप करण्याची पाळी येत नाही.

शेख सादी या सूफी संताने एका अहिंसाव्रती फकिराची कहाणी सांगितली आहे. बगदाद शहरात उज्ञान बिन युसूफ नावाचा एक जुलमी बादशहा राज्य करीत होता. त्याला कळले की, एक अहिंसाव्रत पाळणारा सर्वसंगपरित्याग केलेला फकीर गावात आला आहे. त्याच्या अंगी दैवी सामर्थ्य आहे. तो अल्लाची प्रार्थना करेल तसेच घडेल. हे लोकांनी अनुभविले आहे तेव्हा त्या बादशाहाने त्या फकिराला बोलाविले. प्रजा त्रस्त आहे. दुःखीकष्टी आहे. त्यामुळे राज्यात असंतोष आहे. तेव्हा अल्लाची प्रार्थना करावी आणि हा असंतोष घालवावा, अशी त्याने त्या फकिराला विनंती केली. फकिराने अल्लाची प्रार्थना केली. हे परवरदिगार या बादशहाचे प्राण त्वरित हरण कर बादशहा दचकलाच. अहिंसक फकिराने अशी हिंसक प्रार्थना करावी ? शेख सादी म्हणतो. बादशहा, तुझ्या जगण्याचा लाभ कुणालाही नाही, तेव्हा तू मरावंस यापरता पर्याय नाही. प्रजेचं मरण संपवायचं, तर दुष्ट राजाला मरण दाखवलंच पाहिजे. अनेकांच्या सुखासाठी एकाचं मरण मागणं, हे अहिंसा पाळणंच होय.

– किशोर गांधी



राजयोगिनी बी. के. संतोष दीदी यांना ‘जागतिक आध्यात्मिक नेतृत्व पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

# राजयोगिनी बी. के. संतोष दीदी यांना ‘जागतिक आध्यात्मिक नेतृत्व पुरस्कार’ प्रदान

नगर – नाशिक येथे आयोजित राजयोगिनी बी. के. संतोष दीदी यांच्या सहस्रचंद्रदर्शन सोहळ्यात त्यांना ‘विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स’तर्फे ‘जागतिक आध्यात्मिक नेतृत्व पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले. संस्थेचे संस्थापक डॉ. दीपक हरके आणि ब्रह्माकुमारीजच्या गॉडलीवुड स्टुडिओचे कार्यकारी संचालक डॉ. बी. के. हरिलाल भानुशाली यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

ब्रह्माकुमारीजच्या संयुक्त मुख्य प्रशासिका राजयोगिनी बी. के. संतोष दीदी यांनी आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार, राजयोग ध्यान, मानवी मूल्यांची जोपासना तसेच समाजात शांती, प्रेम आणि विश्वबंधुत्वाची भावना रुजविण्यासाठी केलेल्या कार्याची या पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली.

या पुरस्काराबद्दल ‘विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स’च्या अध्यक्षा मिस इंडिया डॉ. ईशा अग्रवाल यांनी राजयोगिनी बी. के. संतोष दीदी यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या आध्यात्मिक आणि मानवसेवेच्या कार्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जुन्या नाणी व नोटांच्या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना इतिहासाची अनोखी सफर

## सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग; संग्राहक इंजि. सचिन डागा यांच्याकडून माहिती



मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने शहीद अशफाकुल्ला खान व स्वतंत्रता सेनानी बहादूर शाह जफर यांच्या जयंतीनिमित्त पी. ए. इनामदार स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे ऐतिहासिक नाणी व नोटांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

नगर – मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने शहीद अशफाकुल्ला खान व स्वतंत्रता सेनानी बहादूर शाह जफर यांच्या जयंतीनिमित्त पी. ए. इनामदार स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे ऐतिहासिक नाणी व नोटांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना विविध राजवटींमधील चलनांचा इतिहास जाणून घेण्याची अनोखी संधी मिळाली. मुकुंदनगर परिसरासह शहरातील विविध उपनगरांतील शाळांमधील सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट देत सहभाग नोंदविला. या प्रदर्शनात शिवशाही, निजामशाही, मुघल व ब्रिटिश काळातील नाणी आणि नोटांचा संग्राहक इंजिनियर सचिन डागा यांच्या अनमोल संग्रह मांडण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील नाणी, अहमदनगरच्या ऐतिहासिक राजवटींतील चलन, काश्मिरी राजांची नाणी, ब्रिटिशकालीन शिक्के व नोटा, संस्थानिक राजांची चलने, पोर्तुगीज नोटा, हैदराबादच्या निजामाच्या काळातील नोटा तसेच स्वतंत्र भारतातील जुन्या व नवीन चलनातील नाणी व नोटा विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरल्या. याशिवाय स्मारक नाणी, खोटी नाणी, तांत्रिक त्रुटी असलेली नाणी आणि विविध कालखंडांतील दुर्मीळ चलनप्रकारही प्रदर्शनात पाहण्यासाठी ठेवण्यात आले होते. या ऐतिहासिक संग्रहाची माहिती सचिन डागा यांनी विद्यार्थ्यांना सविस्तरपणे दिली. प्रत्येक नाणे आणि नोटेमागील इतिहास, त्यावरील चिन्हे, तत्कालीन राजवटी आणि त्या काळातील आर्थिक व्यवहार यांची माहिती जाणून घेताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.

यावेळी इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे उपाध्यक्ष इंजिनिअर इकबाल सय्यद, आर्किटेक्ट विकार काझी, विविध प्रकारच्या पुस्तकांचे संग्राहक शब्बीरभाई शेख, डॉ.अशफाक पटेल, प्रा.नवेद बिजापुरे, शफकत सय्यद, जावेद तांबोली, अमजद पठाण, शेख रिजवान बिलाल, पंकज मेहेर, ठाकुरदास परदेशी, तन्वीर चष्मावाला, सलीम सहारा, उबेद शेख आदी उपस्थित होते.

आबिद खान यांनी स्वागत केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शब्बीर शेख यांनी केले.

# अहिल्यानगरमध्ये अंध कलाकारांचा स्वर दीपावलीचा सांगीतिक अविष्कार



नगर – दिवाळी २०२६ च्या निमित्ताने नगरच्या माऊली सभागृहात दिव्यदृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आयोजित आणि कलानिपुण कलावंतांच्या संकल्पनेतून साकारलेल्या स्वर दीपावली या सांगीतिक संध्याकाळने रसिकांची मने जिंकली. दिव्यांग युवक–युवतींच्या कलागुणांवर आधारित हा सोहळा केवळ एक गाण्यांचा कार्यक्रम नसून, रसिकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणणारा आणि मनाचा ठाव घेणारा एक अभूतपूर्व अनुभव ठरला. या कार्यक्रमाला लाभलेला प्रतिसाद पाहून कला ही कधीही अपंगत्वाची मोहताज नसते, तर ती साधना बोलते याची प्रचिती आली.

कार्यक्रमाची सुरुवात तू सुखकर्ता तू दुखहर्ता या गीताने झाली. यानंतर बाजेरी मुरलिया बाजे, मेरे खवाबों में जो आये, चांदी जैसा रंग तेरा, चंद्रा लावणी, ये मेरा दिल..., तुला पाहिले मी ते अगदी ऐ मेरे वतन के लोगो आणि आली माझ्या घरी ही दिवाळी पर्यंतच्या एकापेक्षा एक सरस मराठी–हिंदी भावगीते, भक्तीगीते आणि चित्रपट गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

सुगम व शास्त्रीय संगीताचे जाणकार निलेश शिंदे, सौदागर लोंढे, अलका शिंदे, पूनम मापारी आणि गौरी इंगळे या कलाकारांनी आपल्या सुरेल आवाजाने मैफिलीत प्राण फुंकले. त्यांना की–बोर्डवर किशोर उबाळे व अंकुश जाधव, तबलावादक शेखर दरवडे, ढोलकी झाली बोलकी फेम पुष्पराज पवार आणि ऑक्टोपॅड–कोंगो वादक किरण आचार्य यांनी तोलामोलाची साथसंगत केली. महादेव सत्रे व डॉ. प्राजक्ता सावडेकर यांनी ओघवत्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. या कार्यक्रमास अहिल्यानगरचे डाक अधीक्षक विकास पालवे, डीवायएसपी शिरीष वामने आणि उद्योजक नवनाथ धुमाळ यांची उपस्थिती लाभली होती.

दोन महिने अहोरात्र मेहनत घेऊन दिव्यांग कलाकारांनी हा सोहळा यशस्वी केला. कार्यक्रमाचे नियोजन यशस्वी करण्यासाठी नगर शहरातील संगीत जगताचे पालक डॉ. दमन काशीद, ऋणानुबंध ग्रुप यांच्यासह अशोक गांधी, डॉ. दिलीप जोंधळे, डॉ. प्रदीप इंगळे, डॉ. स्मिता पठारे, डॉ. धनंजय कुलकर्णी, कैलास गाडिलकर, ॲड. सचिन काळे आदी दात्यांनी सढळ हाताने आर्थिक मदत केली. तसेच अजित रोकडे, शिवाजी साळवे, महेश घावटे आणि हेमंत कराळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. विशेष म्हणजे, शाळकरी मुलांनी अंध कलाकारांना व्यासपीठावर नेण्या–आणण्यासाठी केलेली जिवाभावाची मदत पाहून उपस्थितांचे मन भरून आले. संस्थेचे अध्यक्ष कृष्णा तवले व सदस्य सुनील बाचकर यांनी आभार मानले.

तसेच या संस्थेचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी किंवा मदत करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी व दात्यांनी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले.

# कोजागिरीनिमित्त ज्येष्ठ नागरिक मंचची गीतांची मैफील



कोजागिरी पौर्णिमेनिमित्त ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने गीतांची मैफील आयोजित करण्यात आली होती.

नगर – कोजागिरी पौर्णिमेनिमित्त ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने सुनील महाजन, श्रीरामकुमार दुमणे, नीता माने, मुन्नाभाई या कलावंतांच्या हिंदी व मराठी गीतांची मैफील आयोजित केली होती. कार्यक्रमास सर्वोत्तम क्षिरसागर, स्मिता मुळे, सुनंदा कुलकर्णी, वैशाली केळकर, सतीश सातभाई, खणकर सर, वैशाली कुलकर्णी, जहागिरदार, परोपकारी, केसकर आदी सभासद उपस्थित होते.

प्रतिक्षा बोबडे या छोट्या कलावंताने सादर केलेल्या गीतांना वन्समोअरची दाद मिळाली. सुनील महाजन यांनी निवेदन केले. कलाकारांचा परीचय बाजीराव जाधव यांनी करून दिला. ज्या सभासदांचे वाढदिवस होते ते यावेळी साजरे करण्यात आले. त्यांनी ज्येष्ठ नागरिक मंचला देणग्या दिल्या. मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, कार्यवाह ज्योती केसकर, बलभीम पांडव, एस. आर. जोशी, पुष्पा चितबंर, शुभदा जहागिरदार, चारूशीला करवंदे, हरिश्चंद्र थिगळे, स्नेहल वेलणकर, बाजीराव जाधव यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन पुष्पा चितंबर यांनी केले. स्नेहल वेलणकर यांनी आभार मानले.



महाराष्ट्र शासनाची अमृत संस्था व चिरंजीव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने खास दिवाळीनिमित्त अमृतपेठ थेट – बाजारपेठ या प्रदर्शनाचे दोन दिवस सावेडी येथील हॉटेल द व्हाईट हाऊसमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

## अमृत संस्था व चिरंजीव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीनिमित्त

# ‘अमृतपेठ–थेट बाजारपेठ’ प्रदर्शनाचा प्रारंभ

नगर – महाराष्ट्र शासनाची अमृत संस्था व चिरंजीव प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने खास दिवाळीनिमित्त अमृतपेठ थेट – बाजारपेठ या विशेष प्रदर्शनाचे आयोजन २९ व ३० ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. सावेडी येथील हॉटेल द व्हाईट हाऊस, कोहिनुर मॉल जवळ येथे सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत सर्वांसाठी खुले असणार आहे. स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी अमृतपेठ हा विशेष उपक्रम राज्यशासनाच्या अमृत संस्थे मार्फत नेहमी रबावला जातो. या प्रदर्शनास नागरिकांनी भेट देऊन स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन दयावे असे आवाहन अमृत संस्थेचे अहिल्यानगर जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी केले. या प्रदर्शनामध्ये स्थानिक लघु उद्योजकांचे स्टॉल्स असून त्यात महिला उद्योजकांना प्राधान्य देण्यात आले अहे. नागरिकांना येथे दिवाळीसाठी विविध प्रकारचे दर्जेदार स्वदेशी व घरगुती उत्पादने माफक दरात थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये विविध खाद्यपदार्थ,दिवाळी साठी उपयोगी सर्व वस्तू, सजावट,दैनंदिन वापराच्या वस्तू, कपडे, आयुर्वेदिक उत्पादने, कॉस्मेटिक, ज्वेलरी व हस्तकलेच्या वस्तूंचा समावेश आहे.

आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली व नगरसेवक ऋग्वेद महेंद्र गंधे यांच्या उपस्थितीत प्रदर्शनास प्रारंभ झाला. यावेळी अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे, चिरंजीव प्रतिष्ठानचे अध्यक्ष स्वप्नील देशमुख, प्रसाद पुंडे, शुभंकर गटणे, विनय कुलकर्णी, महेश देशपांडे, वृषाली भोपे, निनाद देव, सौरव दंडवते श्रीपाद फाटक, चाणक्य देवचक्के, कैलास शिंदे, शशिकांत तांबे, अनुराग कुलकर्णी, आदी उपस्थित होते. प्रदर्शनाच्या अधिक माहितीसाठी ९११२२२८७६९ या मोबाईलवर संपर्क साधावा.

# दिव्यांगांच्या मदतीसाठी १ नोव्हेंबरला संगीत मैफिल

नगर – नेत्रतज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांच्या सहकार्याने, चिटगोपेकर व्हेंचर्सच्या द मेलडी मंदिर प्रॉडक्शन्सतर्फे, आर.सी. इंटिग्रिटी आणि द ड्युओ क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने १ नोव्हेंबर रोजी सुरों का सफर हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

प्रोफेसर कॉलनी रोडवरील अकाया एलिगन्स येथे सायंकाळी ७ वाजल्यापासून हा कार्यक्रम रंगणार आहे. या मैफलीत गायिका गीता कुलकर्णी, तसेच गायक प्रल्हाद जाधव आणि गिरिराज जाधव आपल्या सुमधुर गायनातून गुलाम अली, जगजीत सिंह, मेहंदी हसन, लता मंगेशकर, किशोरकुमार, आशा भोसले, पंकज उदास आणि इतर काही या महान गायकांच्या गझल, सुफी, चित्रपट आणि क्लासिकल गीतांद्वारे रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. अविस्मरणीय गीतांचा ठेवा, भावपूर्ण गझला आणि सुरेल संगीताच्या माध्यमातून रसिकांना संस्मरणीय सांगीतिक अनुभव देण्याचा या कार्यक्रमाचा प्रयत्न आहे.



बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (करिअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च) (आयएमएससीडीआर) या संस्थेच्या डॉ. प्रणोती तेलोरे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी नुकताच पदभार स्विकारला.

# आय.एम.एस.सी.डी.आर. संस्थेच्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रणोती तेलोरे



नगर – बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (करिअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च) (आयएमएससीडीआर) या संस्थेच्या डॉ. प्रणोती तेलोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेच्या इतिहासात संचालकपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. त्यांनी प्रभारी संचालकपदी १ जुलै रोजी तात्पुरता पदभार स्वीकारला होता. त्यानंतर १४ जुलै रोजी त्यांनी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. या निमित्ताने त्यांनी नुकताच आपल्या नवीन कार्यालयात प्रवेश केला. यावेळी छोटेखानी प्रार्थना आयोजित करण्यात आली होती. रेव्हरंड फिलिप अब्राहम यांनी प्रार्थना केली.

आयएमएससीडीआर संस्थेची स्थापना १९९१ मध्ये झाली असून, व्यवस्थापन शिक्षणाच्या क्षेत्रात संस्थेने गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय योगदान दिले आहे. संस्थेला विविध राष्ट्रीय व प्रादेशिक पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून, संस्थेला राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक), बेंगळुरू यांची मान्यता प्राप्त झाली आहे. डॉ. तेलोरे यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात कॉर्पोरेट क्षेत्रातून केली. मात्र, अध्यापनाची आवड त्यांना आय.एम.एस.सी. डी.आर.मध्ये घेऊन आली. गेल्या २५ वर्षांपासून त्या संस्थेशी संलग्न असून, त्यांनी सुरुवातीला एमसीए विभागात आणि त्यानंतर एमबीए विभागात प्राध्यापक म्हणून काम केले. गेल्या तीन वर्षांपासून त्या व्यवस्थापन विभागप्रमुख म्हणून कार्यरत होत्या. विहित निवड प्रक्रिया आणि सखोल मुलाखत प्रक्रियेनंतर त्यांच्याकडे प्रभारी संचालकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संस्थेच्या इतिहासात प्रभारी संचालकपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी डॉ. प्रणोती तेलोरे यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी सोसयटीचे अध्यक्ष बार्नबस, सचिव विशाल बार्नबस, प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, आयएसडब्ल्यूआर–सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, आयएमएससीडीआरचे सल्लागार डॉ. एम. बी. मेहता आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, डॉ. नोएल पारगे, डॉ. भालसिंग, डॉ. रझाक, डॉ. नाबदे आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे उपस्थित होते.

आयएमएससीडीआरच्या वतीने व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. हातिम कय्युमी, आयटी विभागाचे डॉ. महेश पोतदार, कार्यालय अधीक्षक महेश दीक्षित, लेखापाल नरेंद्र कदम, ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस आणि व्यवस्थापन विभागाच्या प्राध्यापिका प्रा. साक्षी मध्यान उपस्थित होत्या. राजू लोणकर यांनी स्वागत केले.

# ३० हजार ४९० झाडांची कत्तल झाल्याच्या कथित प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाई करावी

नगर – टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने भीमाशंकर परिसरातील ३० हजार ४९० झाडांची कत्तल झाल्याच्या कथित प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (रिपाइं), नगर शहरच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले. या वेळी शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, स्वप्नील साठे, लकी वाघमारे, जमीर सय्यद, अरबाज शेख, अजीज शेख, जावेद सय्यद, शहबाज शेख, अजय बडोदे, योहान चाबुकस्वार, आयान शेख आणि राहुल ठोकळ आदी उपस्थित होते.

### विकासाच्या नावाखाली निसर्गाचा ऱ्हास थांबवा! : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया



३० हजार ४९० झाडांची कत्तल झाल्याच्या कथित प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले.

भीमाशंकर परिसर हा जैवविविधतेने समृद्ध असून पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. येथील नैसर्गिक जंगल अनेक वन्यजीव, पक्षी, कीटक आणि विविध वनस्पतींचे अधिवास आहे. जंगलामुळे पावसाचे चक्र संतुलित राहण्यास, भूजलसाठ्याचे पुनर्भरण होण्यास, जमिनीची धूप रोखण्यास आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते. अशा संवेदनशील परिसरातील मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होण्याची भीती रिपाइंच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

टोरेंट पॉवर कंपनीच्या प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या वृक्षतोडीची अधिकृत संख्या, संबंधित परवानग्या, पर्यावरणीय मंजुरी आणि लागू कायद्यांचे पालन झाले आहे किंवा नाही, याची सक्षम यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. वृक्षतोडीमुळे वन्यजीवांचे अधिवास, स्थानिक जलस्रोत आणि जैवविविधतेवर नेमके काय परिणाम झाले आहेत, याचे स्वतंत्र पर्यावरणीय मूल्यमापनही करण्यात यावे, असे पक्षाने म्हटले आहे.

विकास प्रकल्प राबविताना पर्यावरणीय संतुलन आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण याकडे दुर्लक्ष होता कामा नये. जंगलांचा ऱ्हास झाल्यास वन्यजीवांच्या अधिवासावर संकट निर्माण होऊ शकते. त्याचबरोबर जलचक्र, भूजलसाठा आणि मातीची सुपीकता यांवरही दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून वस्तुनिष्ठ चौकशी करणे आवश्यक असल्याची भूमिका रिपाइंने मांडली.

चौकशी पूर्ण होऊन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी होईपर्यंत पुढील वृक्षतोडीला स्थगिती देण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकरणाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशीत नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित कंपनी, कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच नष्ट झालेल्या वनसंपत्तीची भरपाई करण्यासाठी स्थानिक पर्यावरणाला अनुरूप वृक्षलागवड आणि वनपुनर्संचयितीकरणाचा कालबद्ध आराखडा तयार करावा. लावण्यात आलेल्या झाडांची देखभाल, संवर्धन आणि वाढ यावर नियमित देखरेख ठेवावी. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर झालेल्या परिणामांचा अहवाल, वृक्षतोडीसंबंधीच्या परवानग्या आणि प्रशासनाने केलेल्या कारवाईचा तपशील नागरिकांसाठी पारदर्शकपणे सार्वजनिक करावा, अशी मागणीही पक्षाने केली.

जंगलांचे संरक्षण करणे ही शासनाबरोबरच समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास रोखून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरण जतन करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन न्याय्य कार्यवाही करावी; अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही रिपाइंच्या वतीने देण्यात आला.

## गुरुवाणी – ९५
## भावनांची निर्मलता



सुग्रीव नगर नावाचे एक समृद्ध राज्य होते. तिथे राजा बलभद्र राज्य करत होता आणि त्याच्या अत्यंत राणीचे नाव मृगावती होते. त्यांना एक पुत्र होता, ज्याचे नाव बलश्री असे होते. मात्र, मातेचा अत्यंत प्रिय असल्याने तो 'मृगापुत्र' या नावानेच ओळखला जात असे. तो राजमहालात आनंदात आयुष्य जगत असतो. एकेदिवशी तो महालातून आपल्या नगरीतील लोकांना पाहत असताना त्याची नजर एका योगीवर पडली. त्याला पाहताच मृगापुत्राच्या मनात स्पंदने जागृत झाली. त्या योगी सारख्या साधनेचा आपणही अनुभव घेतला असल्याचे त्याला जाणवले.

सुख दुःख दोन्हीचे स्मरण त्याला झाले. ज्याला यशस्वी कसे झालो आणि अपयशी कसे झालो हे लक्षात राहते तो कधी चुका करत नाही. योगीला अनेकांनी पाहिले असेल पण त्याला पाहून केवळ मृगापुत्रला आलेली अनुभूती वेगळी होती. आपल्याकडेही अशी नजर हवी की आपणही योगीच्या योगाकडे पाहू शकू. मृगापुत्राच्या मनात अनेक प्रश्न जन्मले आणि लाजवाब उत्तरांचा शोध सुरू झाला. पूर्वजन्मीची स्मृती जागृत होऊन आतील पाणी शांत झाले, मोह संपुष्टात आला. त्याला कळले की आपण साधना करून देवलोकात गेलो ,पण तिथे आपल्याला पश्चात्ताप झाला होता. आपली साधना कमी पडली म्हणून नरकातही जावे लागले होते. त्याने आईवडीलांकडे जाऊन दीक्षा घेण्याची परवानगी मागितली. भौतिक शरीर सोडण्याआधी आत्मकल्याण करायचे आहे, असे त्याने सांगितले. मला संयमाच्या मार्गावर जायचे आहे. आईवडील समजावतात, संयमी जीवन खूप कठीण आहे. शत्रू आणि मित्राला एकाच नजरेने पाहता येणे अतिशय अवघड असते. ही भावनांची निर्मलता जीवनात आली पाहिजे. हे महाव्रत असते. ते शरीरानेच नाही तर मनानेही हवे. संयमाचा मार्ग म्हणजे तलवारीच्या धारेवर चालणे असते. पण मृगापुत्र एकच उत्तर देतो, 'ज्याच्यात संसार सुखाची लालसा नाही त्याला संयमाचा मार्ग सुकर होतो. मी तर नरकयातनाही भोगल्या आहेत. त्यामुळे मला संयमाच्या मार्गातील तुम्ही सांगितलेल्या

अडचणींचे काही वाटत नाही'. मृगापुत्र अनुभूती सांगत असतो, कुठे वाचलेले सांगत नसतो. आई म्हणते, संयमी जीवनात तू आजारी पडलास तर तुझ्याकडे कोण लक्ष देणार? मृगापुत्र उत्तरतो, जंगलात हरीण आजारी पडले तर कोण त्यांची सुश्रुषा करते. ते स्वतःच बरे होते. मी सुद्धा मृगाचर्या पालन करेल. यानंतर तो संयमाच्या मार्गावर प्रस्थान करतो. आपण आपल्या आत जिथून जिथून निगेटिव्ह गोष्टी येतात तिथले दरवाजेच कायमचे बंद करा. ज्ञान, तपस्येच्या भावनेने एक महिना सल्लेखना करून मृगापुत्र सिद्ध बनला.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

नगर – नगर शहराजवळील पोखर्डी (ता.नगर) परिसरात सुसे वस्तीवर गेल्या काही दिवसांपासून वावरणारा बिबट्या २९ ऑक्टोबर रोजी पहाटे वन विभागाच्या पिंजऱ्यात अडकला आहे.



पोखर्डी परिसरात वावरणारा बिबट्या वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात अडकला.
(छायाचित्र – विजय मते)

पोखर्डीच्या सुसे वस्ती परिसरात एक बिबट्या गेल्या काही दिवसांपासून वारंवार दिसत होता. तो रात्रीच्या वेळी पाळीव प्राण्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करत होता. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या परिसरात बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वन विभागाने पिंजरा लावावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात होती. त्यामुळे २८ ऑक्टोबर रोजी वनरक्षक बाळासाहेब रणसिंग, वनपाल नितीन गायकवाड आणि कर्मचाऱ्यांनी परिसरातील नागरिकांच्या मदतीने बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावला होता. या पिंजऱ्यात २९ ऑक्टोबर रोजी पहाटे बिबट्या जेरबंद झाला आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून भीतीच्या सावटाखाली वावरणाऱ्या ग्रामस्थांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. सकाळी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी बिबट्याला पिंजऱ्यासह ताब्यात घेत नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी नेले आहे.

# दैठणे गुंजाळ सहकारी सोसायटीत २४.४६ लाख रुपयांचा केला अपहार

### सचिव, संगणक प्रणाली पुरवठादार व लेखापरीक्षकावर गुन्हा दाखल

नगर – पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमध्ये सभासदांच्या कर्जाच्या रकमेचा तब्बल २४ लाख ४६ हजार ५५१ रुपयांचा अपहार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या आर्थिक गैरव्यवहारात संस्थेचे तत्कालीन सचिव, संगणक प्रणाली पुरवठादार आणि प्रमाणित लेखापरीक्षक यांनी संगनमत करून फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले असून, पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मुकेश मारुती वडीयार (वय ४४, लेखापरीक्षक श्रेणी–१, विशेष लेखापरीक्षक वर्ग–१, सहकारी संस्था, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. सहकार विभागाच्या आदेशानुसार दैठणे गुंजाळ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चाचणी लेखापरीक्षण करण्यात आले होते. त्यात संस्थेचे तत्कालीन सचिव सुरेश मलबा रोकडे यांनी २०१६ ते २०२३ या कालावधीत कामकाज पाहताना शेतकरी सभासदांकडून कर्जाची परतफेड म्हणून स्वीकारलेली रक्कम अधिकृत पावत्या न फाडता स्वतःजवळ ठेवली व परस्पर अपहार केल्याचे समोर आले. तसेच ताळेबंदाचा मेळ घालण्यासाठी आणि अपहार लपवण्यासाठी संगणकाच्या सॉफ्टवेअरमध्ये खोट्या ट्रान्सफर एंट्री करून हिशोबात फेरफार करण्यात आला.

या अपहारात संगणक प्रणाली पुरवठादार असलेल्या अहिल्यानगर येथील 'परफेक्ट कॉम्प्युटर सिस्टीम' व तिच्या प्रोप्रायटर्सने संस्थेत अत्यंत सदोष अशी प्रणाली बसवली होती, ज्यामध्ये बॅकडेटेड नोंदी करण्याची आणि डेटा पुसून टाकण्याची सोय होती. या सदोष प्रणालीच्या आधारे सचिव रोकडे यांना अपहार लपवण्यासाठी तांत्रिक मदत करण्यात आली. तसेच संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षक सुभाष रघुनाथ दिवटे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत आणि अनधिकृतपणे ताबा घेऊन सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालात या सर्व आर्थिक अनियमिततांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले व खोट्या आर्थिक पत्रकांना प्रमाणित केले.

या प्रकरणी विशेष लेखापरीक्षक मुकेश वडीयार यांच्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात सचिव सुरेश मलबा रोकडे, परफेक्ट कॉम्प्युटर सिस्टीम चे चालक आणि लेखापरीक्षक सुभाष रघुनाथ दिवटे यांच्याविरुद्ध अपहार, विश्वासघात, फसवणूक आणि दप्तराचे बनावटीकरण यांसारख्या गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रणजित मारग करत आहेत.

# 'भाजपा वाहतूक सेल'च्या जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब शिंदे

नगर – नवभारतीय शिववाहतूक संघटना/ भाजपा वाहतूक सेलच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब बाबुराव शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अराफात शेख यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. बाबासाहेब शिंदे यांच्या निवडीबद्दल अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका लांबणीवर; दुष्काळी परिस्थितीमुळे राज्य सरकारचा निर्णय, शासन आदेश जारी

मुंबई – राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाहीर केलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यासह अन्य ठिकाणच्या सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सहकार विभागाने बुधवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त भागातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती मिळणार आहे. मात्र, सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका तसेच न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेश दिलेल्या आणि ज्या संस्थांच्या निवडणुकीतील नामनिर्देशनाचा टप्पा शासन आदेशापूर्वीच सुरू झाला आहे, अशा संस्थांना या निर्णयातून वगळण्यात आले आहे.

राज्य सरकारने ३०४ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागात महसूल, कृषी, पशुसंवर्धन, सहकार, ग्रामविकास, पाणीपुरवठा आणि जलसंधारण यांसह विविध विभागांवर अतिरिक्त प्रशासकीय जबाबदारी निर्माण झाली आहे. दुष्काळी नुकसानीचे पंचनामे, पीक सर्वेक्षण, शेतकऱ्यांना मदत, कर्ज पुनर्गठन, पाणीपुरवठा आणि जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था अशा कामांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत सहकारी संस्थांच्या निवडणुका सुरू ठेवल्यास शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेत गुंतावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुष्काळ निवारण आणि मदतकार्याच्या अंमलबजावणीवर परिणाम होऊ शकतो. याशिवाय दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि सहकारी संस्थांच्या सभासदांना सध्याच्या परिस्थितीत निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे गैरसोयीचे ठरू शकते, असे शासनाने आदेशात नमूद केले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ क क अंतर्गत राज्य सरकारला विशिष्ट नैसर्गिक आपत्ती किंवा टंचाईच्या परिस्थितीत सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा अधिकार आहे. या तरतुदीचा आधार घेत शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या जिल्ह्यांतील सहकारी संस्थांच्या निवडणुका सध्या ज्या टप्प्यावर आहेत, त्याच टप्प्यावरून पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्याचे निर्देश दिले आहेत.

या आदेशातून उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेश दिलेल्या सहकारी संस्था आणि शासन आदेश जारी होण्यापूर्वीच ज्या संस्थांच्या निवडणुकीतील नामनिर्देशनाचा टप्पा सुरू झाला आहे, अशा संस्थांनाही ही स्थगिती लागू होणार नाही.

# गुन्ह्यात साक्ष न देण्याच्या कारणावरून महिलेस फोनवर जीवे मारण्याची धमकी

नगर – एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवनागापूर परिसरात एका गुन्ह्यात साक्ष न देण्याच्या कारणावरून फिर्यादी महिलेस फोन करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींनी फिर्यादीवर दबाव आणल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी नशीम युनुस शेख (वय ४०, रा. जयमल्हार नगर, नवनागापूर, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला घरकाम करून आपला उदरनिर्वाह चालवितात. काही दिवसांपूर्वी अनिकेत सोनवणे यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे किरण पाटोळे व रोहित पाटोळे यांच्याविरुद्ध एक गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्याच्या वादातून २७ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचार ते संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास आरोपींनी फिर्यादी महिलेला फोन केला. आरोपी विजु पटारे आणि राहुल पाटील (दोघे रा. नवनागापूर, ता.नगर) यांनी फोनवर बोलताना फिर्यादीस दमदाटी केली. सोनवणे यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये तुझा मुलगा इरफान युनुस शेख याला उद्या पाटोळ्याच्या पोराविरासविरुद्ध साक्ष देण्यासाठी पाठवू नका, अशी थेट धमकी आरोपींनी दिली.

त्यानंतर फिर्यादीने दिलेल्या माहितीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात भा. न्या. सं. कलम ३५१ (२) नुसार अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कॉलेजवरून घरी जात असताना पाठलाग करत तरुणीचा विनयभंग

### दोघांवर गुन्हा दाखल

नगर – नगर शहरात कॉलेजवरून सायकलवर घरी जात असलेल्या अल्पवयीन तरुणीचा पाठलाग करून तिला अडवत विनयभंग केल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन जणांवविरुद्ध भारतीय न्याय संहितेसह पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, या प्रकरणातील १७ वर्षीय पीडित तरुणी २८ ऑक्टोबर रोजी कॉलेज सुटल्यानंतर आपली सायकल घेऊन घरी जात होती. नगर–पाथर्डी रस्त्यावरून बाराबाभळी येथील अमरधाम समोरील परिसरात आल्यानंतर आरोपींनी तिचा पाठलाग केला.

यादरम्यान आरोपींपैकी चंदर दुर्गा लोखंडे (वय २१,रा. बारा बाभळी, ता.नगर) याने आपल्या ताब्यातील डिलक्स मोटारसायकल फिर्यादीच्या सायकलसमोर आडवी घातली. तसेच माझा मित्र सचिन पाठक याने मला तुझ्यासोबत बोलण्यासाठी पाठवले असून, तू त्याला आवडत असल्याचे सांगत आरोपीने पीडित तरुणीच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. आरोपीने स्वतःच्या साथीदारासाठी पीडित तरुणीवर दबाव टाकत तिचा विनयभंग केला. या घटनेनंतर घाबरलेल्या तरुणीने तात्काळ भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात येऊन घडलेला प्रकार सांगितला.

पीडितेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी चंदर दुर्गा लोखंडे आणि सचिन पाठक या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार आणि बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### यशवंत गाडे विद्यालयात घनकचरा व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रम

नगर – स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने मुकुंदनगर (फकिरवाडा) येथील यशवंत माध्यमिक विद्यालय येथे घनकचरा व्यवस्थापन विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कचऱ्याचे विविध प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, ओला व सुका कचरा, स्वच्छतेच्या चांगल्या सवयी, '७ आर' संकल्पना तसेच कचऱ्याचा योग्य पुनर्वापर व पुनर्चक्रण याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहभागी करून घेत स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता करण्यात आली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्वच्छ शाळा, सुंदर परिसर आणि हरित भविष्य यांचा संदेश देण्यात आला. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बनकर व सत्राच्या मार्गदर्शक सुवर्णा वाघ, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पिकअप अडवून कोयत्याचा धाक दाखवत साडेतीन लाखांना लुटले; गुन्हा दाखल

नगर – पारनेर तालुक्यातील मांडवे गावच्या हद्दीतील घाटात एका पिकअप वाहनाला अडवून तीन अज्ञात दरोडेखोरांनी ड्रायव्हर व क्लिनरला कोयत्याचा धाक दाखवत लाथाबुक्यांनी जबर मारहाण केली. तसेच वाहनातील रोख ३ लाख ४१ हजार रुपये आणि दोन मोबाईल असा एकूण ३ लाख ५३ हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने लुटून नेल्याची घटना २८ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मजहर खुदाबक्ष शेख (वय ३३, रा. घर नं. १४, वाबळे कॉलनी, मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे इम्रान हबीब शेख यांच्या कोंबड्या वाहतूक करणाऱ्या पिकअप गाडीवर (क्र.एम.एच. १६ डी.पी. ३१३०) चालक म्हणून काम करतात. २६ ऑक्टोबर रोजी ते व त्यांच्या सोबतचा सहकारी बब्बू हे गाडीत जिवंत कोंबड्या भरून गुजरातमधील सुरत येथे व्यापाऱ्यांना देण्यासाठी गेले होते. तेथे कोंबड्या खाली करून उधारीचे ३ लाख ४१ हजार रुपये रोख जमा करून ते २७ ऑक्टोबरला सायंकाळी अंकलेश्वरवरून अहिल्यानगरकडे परत येण्यास निघाले होते. २८ ऑक्टोबर रोजी पहाटे चार वाजेच्या सुमारास पारनेर तालुक्यातील मांडवे गावाच्या पुढे घाटात त्यांची पिकअप आली असता, पाठीमागून आलेल्या एका नंबर नसलेल्या सिल्व्हर रंगाच्या इनोव्हा कारने त्यांच्या गाडीला ओव्हरटेक करून पुढे गाडी आडवी लावली. इनोव्हामधून उतरलेल्या तीन दरोडेखोरांपैकी एकाच्या हातात धारदार कोयता होता. तिघांनी मजहर शेख आणि बब्बू यांना गाडीतून खाली ओढून लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली व शिवीगाळ करत पैसे कुठे ठेवले आहेत अशी विचारणा केली. त्यानंतर गाडीच्या डिक्कीत ठेवलेले ३ लाख ४१ हजार रुपये रोख आणि त्यांच्याकडील १२ हजार रुपये किमतीचे ओपो कंपनीचे दोन मोबाईल फोन बळजबरीने हिसकावून घेऊन दरोडेखोर इनोव्हा कारमधून पसार झाले.

घटनेनंतर पीडितांनी जवळच्या एका चहाच्या टपरीवर जाऊन मालक इम्रान शेख आणि पोलिसांना घटनेची माहिती दिली. या प्रकरणी मजहर खुदाबक्ष शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९ (६), १२६ (२), ३ (५) प्रमाणे तीन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पारनेर पोलीस ठाण्याचे स.पो.नि. सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोपट रोकडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# दीपावलीनिमित्त ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबरला मंदिर स्वच्छता महाअभियान

नगर – विश्व हिंदू परिषद आणि मंदिर अर्चक पुरोहित आयाम यांच्या वतीने दिपावली निमित्त मंदिर स्वच्छता महाअभियान राबविण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील व शहरातील सर्व मंदिर विश्वस्त, मंदिर पुरोहित, गणेश मंडळे महिला भजनी मंडळे, समाज सेवी संस्था व मंदिरात श्रद्धेने जाणाऱ्या सर्व भक्तांना विश्व हिंदू परिषदेतर्फे आवाहन करण्यात आले आहे की, ज्याप्रमाणे आपण दिपावली निमित्त आपले घर व परिसर स्वच्छ करतो, त्याचप्रमाणे प्रत्येकाने आपापल्या परिसरातील मंदिरे माझे मंदिर स्वच्छता ही माझी जबाबदारी आहे या भावनेतून मंदिर स्वच्छ करावीत. हे अभियान ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर असे दोन दिवस सक्रियपणे होणार आहे.

आपल्या परिसरातील मंदिरे ही आपली ऊर्जा व संस्कार केंद्र आहेत. या निमित्ताने परिसरातील तरुण–तरुणी, लहान मुले, महिला यांना सोबत घेऊन मंदिरांची स्वच्छता करावी. त्यामुळे या सर्वांचा मंदिराविषयी आलेला स्नेह, जवळीक वाढेल आणि हे सर्व जण मंदिराशी जोडले जातील. प्रत्येक मंदिर व्यवस्थापनाने या कार्यक्रमात पुढाकार घेऊन दिपावलीपूर्वी आपली मंदिरे स्वच्छ करण्यासाठी परिसरातील नागरिकांना सहभागी करून घ्यावे व हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन विहिंपचे जिल्हा मंत्री अनिल जोशी, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, जिल्हा संपर्क प्रमुख श्रीकांत नांदापूरकर, सहप्रमुख हरीभाऊ डोळसे, श्रीराम नगर प्रखंड प्रमुख दिनेश परदेशी, अंबिकानगर प्रखंड प्रमुख अरुण खिची, मार्गदर्शक मिलिंद मोभारकर, मनोहर भाकरे, मातृशक्ती संयोजिका हिरा शहापूर, दुर्गावाहिनी संयोजिका जयश्री पोटे व बजरंग दलाचे जिल्हा संयोजक सोमनाथ चितळकर यांनी केले आहे.

### तबलानवाज अच्युत सुतार यांना १ नोव्हेंबरला 'नाद वंदना'तून अभिवादन



नगर – ज्येष्ठ तबलावादक अच्युत सुतार यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी १ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात 'नाद वंदना' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संगीत क्षेत्रातील गुणीजन पं. रेवन्नाथ भनगडे, केशव गाडेकर, अंगद गायकवाड, मकरंद खरवंडीकर आणि पवन नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

कै. सुतार यांनी तबलावादन, अध्यापन, संगीतप्रसार आणि गुरू–शिष्य परंपरेच्या द्वारे संगीत क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. नामवंत गायकांना तबल्याची साथ देतानाच त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले. विविध घराण्यांतील गुरूंकडून प्रशिक्षण घेत त्यांनी स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली होती. कर्जत तालुक्यातील चिंचोली काळदात येथे जन्मलेल्या सुतार यांच्या कलासाधनेचा गौरव करण्यासाठी त्यांच्या शिष्यगणांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन सतीश काळे, प्रशांत थोरात, अभिजित राऊत, मुकुंद बोरकर, बिभीषण सूर्यवंशी, प्रफुल्ल जाधव, दादा गावडे, श्याम नानेकर, महेंद्र पळसकर आणि बन्सी शेळके यांनी केले आहे.

